International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor – 0.899
Vol.2 No.1 Sept - Oct 2014

# काजूबागेची स्थापना व वार्षिक मशागत खर्चाचे अर्थशास्त्र

**डॉ. सुग्रीव भानुदास भंडारे**

*सहयोगी प्राध्यापक*

*आजरा महाविद्यालय, आजरा,जि. कोल्हापूर.*

## १: प्रस्तावना:

सध्या भारतीय शेतकऱ्यांमध्ये शेती हा एक व्यवसाय आहे. तो आधुनिक पद्धतीने, व्यापारी तत्त्वावर केल्यास स्वत:ची आर्थिक उन्नती साधता येते याची जाणीव निर्माण झालेली आहे. काजू बाग व्यवसाय आधुनिक पद्धतीने केला असता तो शेतकऱ्यांना कितपत किफायतशीर ठरतो? याचा अभ्यास केला आहे. नमुना पहाणीतील संकलित तथ्यांचे पृथ:करण आणि स्पष्टीकरणाचा आधार घेऊन काजू बाग लागवड व मशागत खर्च म्हणजे काजू बागेच्या अर्थशास्त्राचा अभ्यास केला आहे.

## २: काजू उत्पादक शेतकरी निवड :

महाराष्ट्र शासनाकडून १९९०-९१ पासून रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून काजू लागवडीसाठी १०० टक्के अनुदान दिले जाते. ज्या शेतकऱ्यांनी १९९९-२००० या साली या योजनेच्या अनुदानावर चंदगड, भुदरगड व आजरा या तीन तालुक्यात काजू लागवड केली आहे. अशा शेतकऱ्यांच्या मुख्य यादीतील (तालुका कृषी अधिकारी कार्यालय) शेतकऱ्यांची निवड गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धती (Non-probability Sampling Method) अंतर्गत सोईस्कर नमुना निवड पद्धतीचा (उेीींळशपळशपलश डराश्रिळपस चशींहेव) वापर करुन केली.

## ३: काजू बाग लागवडीखालील क्षेत्रानुसार शेतकरी वर्गवारी

| अ. नं. | शेतकरी गटाचे नाव | लागवडीखालील क्षेत्र |
|---|---|---|
| १ | लहान | ००.०१ ते ०.९९ हेक्टर |
| २ | मध्यम | १.०० ते १.९९ हेक्टर |
| ३ | मोठे शेतकरी | २.०० ते २ हेक्टरपेक्षा जास्त |

## ४: काजू फळबाग स्थापना दर हेक्टरी खर्च :

अभ्यास क्षेत्रातील नमूना शेतकऱ्यांच्या काजूबाग स्थापना खर्चाचे निरीक्षण केले असता असे दिसून आले की, काजू बाग उभारणीसाठी कुटुंबातील सदस्या बरोबरच कुटुंबाबाहेरील शेतमजूरांची मदत घेतात. काजूचे झाड हे प्रामुख्याने पावसाच्या पाण्यावर येणारे झाड मानले जात असल्याने बहूतेक शेतकरी फेब्रुवारी, मार्च, एप्रिल आणि मे महिन्यात १० ते १५ दिवसातून एकदा घागरीने स्त्री मजूरांच्या साह्याने पाणी घालतात. पाण्याची कायमस्वरूपी स्वतंत्र व्यवस्था केलेली नाही. परिणामी पाण्याचा खर्च हा शेतमजूरांच्या खर्चात समाविष्ठ केला आहे.

अभ्यास क्षेत्रातील काजू उत्पादक शेतकऱ्यांनी सेंद्रिय खतामध्ये प्रामुख्याने शेण खताचा वापर केलेला आहे. रासायनिक खतामध्ये प्रामुख्याने युरिया, सिंगल सुपर फॉस्फेट आणि पोटॅश यांचा वापर केलेला असला तरी शेतकरी युरियाचा वापर करत असलेले दिसले. अभ्यास क्षेत्रातील शेतकरी काजू बागेला फवारणी करताना पहिल्या वर्षापासून चौथ्या वर्षापर्यंत बोर्डो मिश्रन वापरतात. क्वचित प्रसंगी बोर्डो पेस्ट वापरतांना दिसतात.

शेतकऱ्यांना एक हेक्टर काजूबाग स्थापनेसाठी पहिल्या वर्षापासून ते उत्पादन सुरू होईपर्यंतच्या कालखंडापर्यंत म्हणजे चौथ्या वर्षांपर्यंत विविध घटकावर जो खर्च करावा लागतो त्याला काजू बाग स्थापना खर्च मानले आहे.

## ५: लहान शेतकरी काजू फळबाग स्थापना(लागवड) दर हेक्टरी रोजगार आणि साहित्य इत्यादी वरील एकूण खर्च : रुपये

| अ. नं. | तपशिल | वर्ष | | | | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ ले वर्ष | २ रे वर्ष | ३ रे वर्ष | ४ थे वर्ष | | |
| १ | **मजूर खर्च** | | | | | | |
| | पुरूष | | | | | | |
| | बाहेरील | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | कुटूंबातील | ७९८५.६८ | ११२६.२ | १२५२.९८ | १३२४.८२ | ११६८९.५० | २०.५४ |
| | स्त्री | | | | | | ०.०० |
| | बाहेरील | ० | ० | ० | ० | ० | ०.०० |
| | कुटूंबातील | ४१७४.२२ | ३७१६.११ | २९१५.३९ | १७०६.४ | १२५१२.१ | २१.९८ |
| | देखरेख खर्च | ५४३.४४ | २५३.३४ | २५३.३४ | २५३.३४ | १३०३.४६ | २.२९ |
| | एकूण | १२७०३.३४ | ५०९५.४७ | ४४२१.७१ | ३२८४.५६ | २५५०५.०८ | ४४.८१ |
| २ | **साहित्य खर्च** | | | | | | ०.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | कंपोष्ट खत | १०९० | १०९ | ० | ० | ११९९.०० | २.११ |
| | रोपे | ३००० | ३०० | ० | ० | ३३००.०० | ५.८० |
| | रासायनिक खते | ७०० | १०५० | १२५० | १३१० | ४३१०.०० | ७.५७ |
| | किटक नाशके | ३०० | ४२० | ५९० | ६६० | १९७०.०० | ३.४६ |
| | कूपन साहित्य | ४५७.७६ | ० | ० | ० | ४५७.७६ | ०.८० |
| | इ तर | २०० | २४० | २८० | ३०० | १०२०.०० | १.७९ |
| | एकूण | ५७४७.७६ | २११९ | २१२० | २२७० | १२२५६.७६ | २१.५३ |
| ३ | हत्यारे | १२५१.२५ | | | | १२५१.२५ | २.२० |
| ४ | खंड | ४००० | ४००० | ४००० | ४००० | १६००० | २८.११ |
| ५ | शेतसारा | ५० | ५० | ५० | ५० | २०० | ०.३५ |
| ६ | घसारा | ४२६ | ४२६ | ४२६ | ४२६ | १७०४ | २.९९ |
| | एकूण ३ ते ६ | ५७२७.२५ | ४४७६ | ४४७६ | ४४७६ | १९१५५.२५ | ३३.६५ |
| | एकूण १ ते ६ | २४१७८.३५ | ११६९०.४७ | ११०१७.७१ | १००३०.५६ | ५६९१७.०९ | १००.०० |
| | शेकडा प्रमाण | ४२.४८ | २०.५४ | १९.३६ | १७.६२ | १००.०० | |

***आधार : नमुना पाहणी***

यावरून असे सिद्ध होते की, एक हेक्टर काजू फळबाग स्थापन करणेसाठी पहिल्या चार वर्षात विविध घटकावरील खर्चामध्ये सर्वात जास्त व महत्त्वाचे खर्च म्हणून मजूरीवरील खर्च (४४.८१ टक्के) जमिनीचा खंड (२८.११ टक्के) आणि साहित्यावरील खर्च (२१.५३ टक्के) यांचा उल्लेख करावा लागेल.

एकूण खर्चात पहिल्या वर्षीचा खर्च सर्वात जास्त (४२.४८ टक्के) आहे. त्याखालोखाल अनुक्रमे दुसऱ्या वर्षाचा (२०.५४ टक्के) आहे. तिसऱ्या वर्षाचा (१९.३६ टक्के) चौथ्या वर्षाचा (१७.६२ टक्के) असा आहे.

## ६: मध्यम शेतकरी काजूफळबाग स्थापना(लागवड)दरहेक्टरी रोजगार आणि साहित्य इत्यादी वरील एकूण खर्च : रुपये

| अ. नं. | तपशिल | वर्ष | | | | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ ले वर्ष | २ रे वर्ष | ३ रे वर्ष | ४ थे वर्ष | | |
| १ | **मजूर खर्च** | | | | | | |
| | पुरूष | | | | | | |
| | बाहेरील | ५१७९.१ | ५५४.०७ | ५१७.२६ | ५३३.०४ | ६७८३.४८ | १२.६२ |
| | कुटूंबातील | २३९०.९ | २९१.७९ | २७६.०२ | २८२.७८ | ३२४१.४६ | ६.०३ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्त्री | | | | | | ०.०० |
| | बाहेरील | १५९०.९ | १४८६.७१ | ११९२.२४ | ७४९.७ | ५०१९.५७ | ९.३४ |
| | कुटूंबातील | २१५१ | १८७६.६७ | १४२८.७६ | ७५९.३८ | ६२१५.८ | ११.५७ |
| | देखरेख खर्च | ४२५.४५ | २१७.१७ | २१७.१७ | २१७.१७ | १०७६.९६ | २.०० |
| | एकूण | ११७३७ | ४४२६.४१ | ३६३१.४५ | २५४२.०७ | २२३३७.२७ | ४१.५६ |
| २ | साहित्य खर्च | | | | | | ०.०० |
| | कंपोष्ट खत | १०१९.९ | १०९ | | | ११२८.९१ | २.१० |
| | रोपे | २९४२.१ | ३०० | | | ३२४२.०६ | ६.०३ |
| | रासायनिक खते | ६२७.६४ | १०२० | १२२० | १२८० | ४१४७.६४ | ७.७२ |
| | किटक नाशके | २३५.३६ | ४०० | ५५० | ६०० | १७८५.३६ | ३.३२ |
| | कूपन साहित्य | ३३४.०१ | | | | ३३४.०१ | ०.६२ |
| | इतर | २३५.३६ | २४० | ३०० | २४० | १०१५.३६ | १.८९ |
| | एकूण | ५३९४.३ | २०६९ | २०७० | २१२० | ११६५३.३४ | २१.६८ |
| | एकूण १+२ | १७१३२ | ६४९५.४१ | ५७०१.४५ | ४६६२.०७ | ३३९९०.६१ | ६३.२५ |
| ३ | ह त्यारे | १६०८.३ | | | | १६०८.३३ | २.९९ |
| ४ | खंड | ४००० | ४००० | ४००० | ४००० | १६००० | २९.७७ |
| ५ | शेतसारा | ५० | ५० | ५० | ५० | २०० | ०.३७ |
| ६ | घसारा | ४८५.४५ | ४८५.४५ | ४८५.४५ | ४८५.४५ | १९४१.८ | ३.६१ |
| | एकूण ३+४+५+६ | ६१४३.७५ | ४५३५.४५ | ४५३५.४५ | ४५३५.४५ | १९७५०.१ | ३६.७५ |
| | एकूण १ ते ६ | २३२७५ | ११०३०.९ | १०२३६.९ | ९१९७.५२ | ५३७४०.७४ | १००.०० |
| | % | ४३.३१ | २०.५३ | १९.०५ | १७.११ | १००.०० | |

***आधार : नमुना पाहणी***

यावरून असे सिद्ध होते की, मध्यम शेतकऱ्यांच्या काजूबाग स्थापना खर्चात शेतमजुरीवरील खर्च प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ४१.५६ टक्के आहे. त्यानंतर जमिनीचा खंड खर्च प्रमाण २९.७७ टक्के आणि साहित्यावरील खर्च प्रमाण २१.६८ टक्के असा आहे.

एकूण खर्चामध्ये पहिल्या वर्षातील खर्च सर्वात जास्त आहे. त्यानंतर दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या वर्षाचा खर्च अनुक्रमे घटत गेला आहे.

## ७: मोठे शेतकरी काजू फळबाग स्थापना (लागवड) दर हेक्टरी रोजगार आणि साहित्य इत्यादी वरील एकूण खर्च : रुपये

| अ. नं. | तपशिल | वर्ष | | | | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ ले वर्ष | २ रे वर्ष | ३ रे वर्ष | ४ थे वर्ष | | |
| १ | मजूर खर्च | | | | | | |
| | पुरूष | | | | | | |
| | बाहेरील | ६५४१.२७ | ४५४.६३ | ४३३.७२ | ४५८.५५ | ७८८८.१७ | १४.९१ |
| | कुटूंबातील | १८३३.५३ | २१९.२४ | २१०.२८ | २२०.९२ | २४८३.९७ | ४.६९ |
| | स्त्रि | | | | | | ०.०० |
| | बाहेरील | १६२९.१ | १३१६.०४ | १०८१.८१ | ६५७.२९ | ४६८४.२४ | ८.८५ |
| | कुटूंबातील | १९९६.५ | १५६३.०३ | १२४५.७९ | ६०२.५८ | ५४०७.९ | १०.२२ |
| | देखरेख खर्च | ४०९.२ | १६२.८ | १६२.८ | १६२.८ | ८९७.६ | १.७० |
| | एकूण | १२४०९.६ | ३७१५.७४ | ३१३४.४ | २१०२.१४ | २१३६१.९ | ४०.३७ |
| २ | साहित्य खर्च | | | | | | ०.०० |
| | कंपोष्ट खत | १०२० | ८० | ० | ० | ११०० | २.०८ |
| | रोपे | ३००० | २४० | ० | ० | ३२४० | ६.१२ |
| | रासायनिक खते | ६०० | ९९२ | १२०० | १२०० | ३९९२ | ७.५४ |
| | किटक नाशके | २०० | ४०० | ५४० | ५५० | १६९० | ३.१९ |
| | कूपन साहित्य | ३९५.२ | ० | ० | ० | ३९५.२ | ०.७५ |
| | इतर | २०० | २०० | २०० | २०० | ८०० | १.५१ |
| | एकूण | ५४१५.२ | १९१२ | १९४० | १९५० | ११२१७.२ | २१.२० |
| ३ | हत्यारे | २०७१.८७ | | | | २०७१.८७ | ३.९२ |
| ४ | खंड | ४००० | ४००० | ४००० | ४००० | १६००० | ३०.२४ |
| ५ | शेतसारा | ५० | ५० | ५० | ५० | २०० | ०.३८ |
| ६ | घसारा | ५१६.२ | ५१६.२ | ५१६.२ | ५१६.२ | २०६४.८ | ३.९० |
| | एकूण ३ ते ६ | ६६३८.०७ | ४५६६.२ | ४५६६.२ | ४५६६.२ | २०३३६.६७ | ३८.४४ |
| | एकूण १ ते ६ | २४४६२.८७ | १०१९३.९४ | ९६४०.६० | ८६१८.३४ | ५२९१५.७५ | १००.०० |
| | % | ४६.२३ | १९.२६ | १८.२२ | १६.२९ | १००.०० | |

*आधार : नमुना पाहणी*

यावरून असे सिद्ध होते की, मोठ्या शेतकऱ्यांच्या एक हेक्टर काजू बाग स्थापनेच्या एकूण खर्चात महत्त्वाचे व सर्वात जास्त खर्च म्हणून मजुरीवरील खर्च ४०. ३७ टक्के, त्याखालोखाल जमिनीचा खंड ३०.२४ टक्के आणि साहित्यावरील खर्च २१.२० टक्के याचा उल्लेख महत्त्वाचा ठरतो. त्यानंतर बाहेरील पुरुषांच्या मजुरीवरील खर्च १४.९१ टक्के, कुटुंबातील स्त्री मजुरीवरील खर्च १०.२२ टक्के, कुटुंबाबाहेरील स्त्रीमजुरी ८.८५ टक्के, रासायनिक खते, त्याखालोखाल कलमी रोपे यांच्यावरील खर्चाच्या प्रमाणाचा नंबर लागतो.

एकूण खर्चात पहिल्या वर्षीचा खर्च सर्वात जास्त ४६.२३ टक्के आहे. त्याखोलोखाल दुसऱ्या वर्षीचा १९.२६ टक्के, तिसऱ्य वर्षीचा १८.२२ टक्के आणि चौथ्या वर्षीचा १६.२९ टक्के असा उत्तरोत्तर घटत गेलेला आहे.

याचे प्रमुख कारण काजू बाग उभारणीसाठीची जमिन तयार करणे, खड्डे खोदणे, खड्डे भरणे, रोपे खरेदी करणे हे खर्च पहिल्यावर्षीच केले जातात नंतरच्या वर्षी हा खर्च करावा लागत नाही.

**८: दर हेक्टरी काजू बाग स्थापना रोजगार व साहित्य इ. सरासरी खर्च : रुपये**

| अ. नं. | तपशिल | शेतकरी | | | ए कूण | शेकडा | सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लहान | मध्यम | मोठे | | | |
| १ | मजूर खर्च | | | | | | |
| | पुरूष | | | | | | |
| | बाहेरील | ६३४३.८ | ६७८३.५ | ७८८८.२ | २१०१५.४ | १२.८५ | ७००५.१४ |
| | कुटूंबातील | ५३४५.७ | ३२४१.५ | २४८४ | ११०७१.२ | ६.७७ | ३६९०.३९ |
| | स्त्रि | | | | | | ०.०० |
| | बाहेरील | ० | ५०१९.६ | ४६८४.२ | ९७०३.८१ | ५.९३ | ३२३४.६० |
| | कुटूंबातील | १२५१२ | ६२१५.८ | ५४०७.९ | २४१३५.८ | १४.७६ | ८०४५.२७ |
| | देखरेख खर्च | १३०३.५ | १०७७ | ८९७.६ | ३२७८.०२ | २.०० | १०९२.६७ |
| | एकूण | २५५०५ | २२३३७ | २१३६२ | ६९२०४.३ | ४२.३१ | २३०६८.०८ |
| २ | साहित्य खर्च | | | | | | ०.०० |
| | कंपोष्ट खत | ११९९ | ११२८.९ | ११०० | ३४२७.९१ | २.१० | ११४२.६४ |
| | रोपे | ३३०० | ३२४२.१ | ३२४० | ९७८२.०६ | ५.९८ | ३२६०.६९ |
| | रासायनिक ख ते | ४३१० | ४१४७.६ | ३९९२ | १२४४९.६ | ७.६१ | ४१४९.८८ |
| | किटक नाशके | १९७० | १७८५.४ | १६९० | ५४४५.३६ | ३.३३ | १८१५.१२ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | कूपन साहित्य | ४५७.७६ | ३३४.०१ | ३९५.२ | ११८६.९७ | ०.७३ | ३९५.६६ |
| | इतर | १०२० | १०१५.४ | ८०० | २८३५.३६ | १.७३ | ९४५.१२ |
| | एकूण | १२२५७ | ११६५३ | ११२१७ | ३५१२७.३ | २१.४७ | ११७०९.१० |
| | एकूण १+२ | ३७७६२ | ३३९९१ | ३२५७९ | १०४३३२ | ६३.७८ | ३४७७७.१८ |
| ३ | ह त्यारे | १२५१.३ | १६०८.३ | २०७१.९ | ४९३१.४५ | ३.०१ | १६४३.८२ |
| ४ | खंड | १६००० | १६००० | १६००० | ४८००० | २९.३४ | १६०००.०० |
| ५ | शेतसारा | २०० | २०० | २०० | ६०० | ०.३७ | २००.०० |
| ६ | घसारा | १७०४ | १९४१.८ | २०६४.८ | ५७१०.६ | ३.४९ | १९०३.५३ |
| | एकूण ३+४+५+६ | १९१५५ | १९७५० | २०३३७ | ५९२४२ | ३६.२२ | १९७४७.३४ |
| | एकूण १ ते ६ | ५६९१७ | ५३७४१ | ५२९१६ | १६३५७४ | | ५४५२४.५३ |
| | % | १०० | १०० | १०० | ३०० | | १००.०० |

*आधार : नमुना पाहणी*

एक हेक्टर काजू बीचा सरासरी स्थापना खर्च रु. ५४५२४.५३ एवढा आहे. या खर्चामध्ये शेतमजूरावरील खर्च ४२.२१ टक्के (रु. २३०६८.०८), साहित्यावरील खर्च २१.४७ टक्के (रु.११७०९.१०), खंड, शेतसारा, हत्यारे घसारा इ. वरील खर्च ३६.२२ टक्के (रु.१९७४७.३४) असा आहे.

एक हेक्टर काजू बाग स्थापन करणेसाठी लहान, मध्यम आणि मोठ्या शेतकऱ्यांचा एकूण खर्च अनुकमे रुपये ५६,९१७, रुपये ५३,७४१ आणि रुपये ५२,९१६ असा आहे.

म्हणजे या शेतकऱ्यांच्या खर्चात अनुकमे घट होत गेली आहे. कारण लहान शेतकऱ्यांपेक्षा मध्यम आणि मोठ्या शेतकऱ्यांच्या शेतीत मोठ्या आकारमानामुळे अंतर्गत बचती प्राप्त होतात. शेतीमध्ये मजुरांचा व साहित्याचा पर्याप्त वापर होतो.

## ९: उत्पादक (फळे लागणारी) काजू बाग दर हेक्टरी वार्षिक मशागत खर्च :

काजू बागेपासून शेतकऱ्याला फायदा होतो की तोटा होतो हे पहाणेसाठी काजूबागेचा वार्षिक खर्च महत्त्वाचा ठरतो काजू बागेसाठी आलेल्या वार्षिक खर्चाची काजू बागेपासून मिळालेल्या वार्षिक उत्पन्नाची तुलना केली असता काजू बागेपासूनचा फायदा किंवा तोटा समजतो. तक्ता मध्ये अभ्यास क्षेत्रातील लहान, मध्यम व मोठ्या शेतकऱ्यांचा दर हेक्टरी उत्पादक काजू बागेचा वार्षिक मशागत खर्च दर्शविला आहे.

खर्च : **रुपये**

| अ. नं. | तपशिल | लहान शेतकरी | | मध्यम शेतकरी | | मोठे शेतकरी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | खर्च रुपये | शेकडा प्रमाण | खर्च रुपये | शेकडा प्रमाण | खर्च रुपये | शेकडा प्रमाण |
| १ | बाहेरील मजूर | | | | | | |
| | पुरूष | ०.०० | ०.०० | ४०२.६३ | २.४६ | ५३२.२ | ३.३६ |
| | स्त्री | ०.०० | ०.०० | १९१९.४८ | ११.७२ | २०२६.६५ | १२.८१ |
| २ | कंपोष्ट खत | ६९१.२८ | ४.१३ | ६५३.४५ | ३.९९ | ६६०.५६ | ४.१८ |
| ३ | रासायनिक खते | ८१६.४७ | ४.८७ | ८२६.२६ | ५.०४ | ८३६.४८ | ५.२९ |
| ४ | किटकनाशके | ४८५.८८ | २.९० | ४६५.३९ | २.८४ | ४७८.३९ | ३.०२ |
| ५ | खेळते भांडवल व्याज (९.५) | ९०८.९४ | ५.४२ | ८७७.५८ | ५.३६ | ८२७.९३ | ५.२३ |
| ६ | शेतसारा | ५० | ०.३० | ५० | ०.३१ | ५० | ०.३२ |
| ७ | घसारा(हत्यारे) | ४२६ | २.५४ | ४८५.४५ | २.९६ | ५१६.२ | ३.२६ |
| | **खर्च (अ)** | **३३७८.५७** | **२०.१६** | **५६८०.२४** | **३४.६८** | **५९२८.४१** | **३७.४७** |
| १ | खंड | ४००० | २३.८७ | ४००० | २४.४२ | ४००० | २५.२८ |
| २ | स्थिर भांडवल व्याज (८.५) | ३८०.४६ | २.२७ | ३८५.५१ | २.३५ | ३८८.१२ | २.४५ |
| ३ | अमोरटायझेशन खर्च | १४२२.९३ | ८.४९ | १३४३.५२ | ८.२० | १३२२.८९ | ८.३६ |
| | एकूण | ५८०३.३९ | ३४.६३ | ५७२९.०२ | ३४.९८ | ५७११.०१ | ३६.१० |
| | **खर्च (ब)** | **९१८१.९६** | **५४.८०** | **११४०९.२७** | **६९.६५** | **११६३९.४२** | **७३.५७** |
| १ | कुटूंबातील मजूर | | ०.०० | | ०.०० | | ०.०० |
| | पुरूष | १३००.७२ | ७.७६ | १२६७.८९ | ७.७४ | ११९६.६ | ७.५६ |
| | स्त्री | ५६२७.९७ | ३३.५९ | २९७९.२३ | १८.१९ | २२५३.६८ | १४.२५ |
| २ | देखरेख खर्च | ६४५.४२ | ३.८५ | ७२३.३८ | ४.४२ | ७३०.४५ | ४.६२ |
| | एकूण | ७५७४.११ | ४५.२० | ४९७०.५ | ३०.३५ | ४१८०.७३ | २६.४३ |
| | **खर्च (क)** | **१६७५६.०७** | **१००.००** | **१६३७९.७७** | **१००.००** | **१५८२०.१५** | **१००.००** |

***आधार : नमुना पाहणी***

प्रत्यक्ष उत्पादनास सुरूवात झालेल्या उत्पादक काजू बागेचा घटकनिहाय वार्षिक मशागत खर्चाच्या अभ्यासावरून असे स्पष्ट होते की, लहान शेतकऱ्यांचा एक हेक्टर उत्पादक काजू बागेचा वार्षिक एकूण

मशागत खर्च (खर्च-क) रुपये १६७५६.०७ रुपये आहे. या खर्चामध्ये खर्च - अ चे शेकडा प्रमाण २०.१६ टक्के आणि खर्च - ब चे प्रमाण ५४.८० टक्के आहे.

एकूण खर्चातील विभिन्न घटकावरील खर्चाचे प्रमाण विचारात घेता सर्वात जास्त खर्चाचे प्रमाण कुटुंबातील स्त्री मजुरीचे ३३.५९ टक्के आहे. त्यानंतर खंडावरील खर्चाचे प्रमाण २३.८७ टक्के आहे. या व्यतिरिक्त इतर घटकावरील खर्चाची पातळी शेतसारा ०.३० टक्के पासून अमोरटायझेशन खर्च ८.४९ टक्के पर्यंत आहे. मध्यम शेतकऱ्यांचा एक हेक्टर उत्पादक काजू बागेचा वार्षिक मशागत खर्च (खर्च-क) रुपये १६३७९.७७ आहे. या खर्चामध्ये खर्च - अ चे शेकडा प्रमाण ३४.६८ टक्के आणि खर्च-ब चे प्रमाण ६९.६५ टक्के आहे.

एकूण खर्चातील विभिन्न घटकावरील खर्चाचे प्रमाण विचारात घेता कुटुंबाबाहेरील पुरुष मजूरीच्या खर्चाचे एकूण खर्चातील प्रमाण २.४६ टक्के तर स्त्री मजुरी खर्चाचे ११.७२ टक्के, कंपोष्ट खतावरील खर्चाचे ३.९९ टक्के, रासायनिक खते ५.०४ टक्के, किटकनाशके २.८४ टक्के, खेळते भांडवल व्याज ५.३६ टक्के, शेतसारा ०.३१ टक्के, हत्यांराचा घसारा २.९६ टक्के, शेतीचा खंड-२४.४८ टक्के, स्थिर भांडवलावरील व्याज २.३५ टक्के, अमोरटायझेशन खर्च ८.२० टक्के, कुटुंबातील पुरुष मजूरी ७.७४ टक्के, कुंटुबातील स्त्री मजुरी १८.१९ टक्के आणि देखरेख खर्च ४.४२ टक्के प्रमाण आहे.

मोठ्या शेतकऱ्यांचा एक हेक्टर काजू बागेचा एकूण मशागत खर्च (खर्च - क) रुपये १५८२०.१५ एवढा आहे. या खर्चामध्ये खर्च - अ चे प्रमाण ३७.४७ टक्के तर खर्च - ब चे प्रमाण ७३.५७ टक्के असे आहे.

घटकनिहाय खर्चाचे एकूण खर्चातील प्रमाण विचारात घेता एकूण मशागत खर्चामध्ये कुटुंबाबाहेरील पुरुष मजुरीवरील खर्चाचे शेकडा प्रमाण ३.३६ टक्के तर कुटुंबाबाहेरील स्त्री मजुरी खर्चाचे १२.८१ टक्के, कंपाष्ट खतावरील खर्चाचे ४.१८ टक्के, रासायनिक खते ५.२९ टक्के, किटकनाशके ३.०२ टक्के, खेळते भांडवलावरील व्याज ५.२३ टक्के, शेतसारा ०.३२ टक्के हत्यारे घसारा ३.२६ टक्के, स्थिर भांडवलावरील व्याज २.४५ टक्के, अमोरटायझेशन खर्च ८.३६ टक्के, कुटुंबातील पुरुष मजुरी ७.५६ टक्के, स्त्री मजुरी १४.२५ टक्के आणि देखरेख खर्च ४.६२ टक्के प्रमाण आहे. यावरून असे सिद्ध होते की, लहान शेतकरी कुटुंबाबाहेरील मजूरांची काजूबाग मशागतीसाठी मदत घेत नाहीत तर मध्यम आणि मोठे शेतकरी अनुक्रमे वाढीव प्रमाणात मदत घेतात.

लहान शेतकरी, मध्यम शेतकरी आणि मोठे शेतकरी यांचे खर्च - अ चे एकूण मशागत खर्चातील (खर्च - क मधील) प्रमाण अनुक्रमे (२०.१६ टक्के, ३४.६८टक्के, ३७.४७ टक्के) वाढत गेले आहे. याचे

मुख्य कारण म्हणजे मध्यम शेतकरी आणि मोठे शेतकरी यांच्या काजूबाग मशागतीच्या कामामधील बाहेरील शेतमजुरांचे प्रमाण अनुक्रमे वाढत गेलेले आहे. खर्च - ब चे एकूण मशागत खर्चातील (खर्च - क) प्रमाण लहान शेतकऱ्यांपासून मोठ्या शेतकऱ्यांकडे अनुक्रमे वाढत गेले आहे.

याचे मुख्य कारण काजूबाग मशागतीमध्ये कुटुंबाबाहेरील पुरुष आणि स्त्री मजूरांचा लहान शेतकऱ्यांपेक्षा मध्यम व मोठ्या शेतकऱ्यांकडून अनुक्रमे वाढीव वापर हे आहे.

लहान शेतकऱ्यांच्या एकूण खर्चात कुटुंबातील स्त्री मजूरी खर्चाचे प्रमाण सर्वात जास्त ३३.५९ टक्के आहे. तर हेच प्रमाण मध्यम शेतकऱ्यांचे १८.१९ टक्के, मोठे शेतकऱ्यांचे १४.२५ टक्के आहे. म्हणजेच एकूण खर्चातील स्त्री मजुरी खर्चाचे प्रमाण लहान, मध्यम व मोठे शेतकरी यांच्यामध्ये अनुक्रमे घटत गेले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे काजूबाग मशागतीमधील कुटुंबातील स्त्री मजुरांचे प्रमाण लहान शेतकऱ्यांपेक्षा मध्यम व मोठ्या शेतकऱ्यांमध्ये कमी होणे आणि कुटुंबाबाहेरील स्त्री मजूरांचे प्रमाण वाढत जाणे हे आहे.

एकूण मशागत खर्च (खर्च - क) लहान शेतकऱ्यांचा १६७५६.०७ रुपये, मध्यम शेतकऱ्यांचा रुपये १६३७९.७७ आणि मोठे शेतकऱ्यांचा रुपये १५८२०.१५ एवढा आहे. म्हणजेच दरहेक्टरी काजू बाग वार्षिक मशागत खर्च (खर्च - क) लहान, मध्यम व मोठे शेतकरी यांचा अनुक्रमे घटत गेला आहे.

याचे प्रमुख कारण म्हणजे मोठ्या व मध्यम शेतकऱ्यांपेक्षा लहान शेतकऱ्यांच्या काजू बागेतील छुप्या बेकारीचे प्रमाण जास्त असणे हे आहे. तसेच लहान शेतकऱ्यांपेक्षा मध्यम व मोठ्या शेतकऱ्यांच्या काजूबागेत मजुराबरोबरच इतर सर्व साहित्याचा पर्याप्त आणि काटकसरीने वापर होतो.

शेतीच्या मोठ्या आकारमानाच्या अंतर्गत बचती लहान शेतकऱ्यांपेक्षा मध्यम आणि मोठ्या शेतकऱ्यांना अनुक्रमे जास्त मिळतात.

## संदर्भ :


१) Datt, Ruddar and Soundharam KPM (1998), Indian Economy, Chand and Compony Ltd. Ramnagar, New Delhi 110055, Thirty-eighth etition 1998, Agriculture: Productivity Trends and Crop Pattern, page 448.

२) बोरकर प्रमोद, गांधी रविकांत, तलाठी जीवन, (डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि.रत्नागिरी) (२००१) काजू लागवड गुंतवणूक अधिक फायद्याची किसान शक्ती, एप्रिल २००१, अंक ४ संपादक बाळ पोतदार, राजारामपुरी, कोल्हापूर पान क्र. ३७

३) संपकाळ बी. बी., पाटील बी. पी., गजभिये आर. सी. (२००८) प्रादेशिक फळ संशोधन केंद्र वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग (महाराष्ट्र) अपारंपारिक भागात सुद्धा काजू लागवड फायद्याची, किसान शक्ती, अंक ९-१०, (फळ शेती विशेष) सप्टेंबर - ऑक्टोबर - २००८/ जोड अंक संपादक बाळ पोतदार, राजारामपुरी, कोल्हापूर पान नं. ११९.

४) कोळेकर पी. बी. (२००४) काजू फळझाडाची व्यावसायिक लागवड व प्रक्रिया उद्योग, प्रकाशन- तात्यासाहेब ग्रामीण विकास केंद्र, पुणे.

५) कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्र, विस्तार शिक्षण संचलनालय, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण, कृषी विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (२००५) काजू लागवड कृषि विस्तार पुस्तिका क्र. २०, पान नं. २२.